# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 17 February 2025

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १७ फेब्रुवारी २०२५ दुपारी १.०० वा.

****

नवी दिल्ली रेल्वे स्थानकारवर झालेल्या चेंगराचेंगरीनंतर प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीनं आणि गर्दीच्या नियंत्रणासाठी रेल्वेनं अनेक पावलं उचलली आहेत. प्रयागराज इथं महाकुंभमेळ्याला जाणाऱ्या भाविकांसाठी रेल्वेनं नवी दिल्लीहून आजपासून पाच अतिरिक्त विशेष रेल्वेगाड्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे. तसंच नवी दिल्ली रेल्वे स्थानकावरून प्रयागराजला जाणाऱ्या सगळ्या विशेष रेल्वेगाड्या फलाट क्रमांक १६ वरून रवाना होतील, नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये असं आवाहन रेल्वे मंत्रालयानं केलं आहे. गर्दीवर नियंत्रण मिळवण्यासाठी तसंच कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी नवी दिल्ली रेल्वे स्थानकावरील सुरक्षा व्यवस्था देखील वाढवण्यात आली आहे.

****

प्रयागराजमधल्या महाकुंभमेळ्यामध्ये भाविकांसाठी उभारण्यात आलेलं आणि तब्बल ४० हजार चौरस फूट क्षेत्रात विस्तारलेलं स्वच्छ सुजल गाव संपूर्ण देशासाठी आदर्श ठरलं आहे. विविध सरकारी उपक्रम इथं कार्यान्वित करण्यात आल्यानं हे गाव उत्तर प्रदेशच्या ग्रामीण भागातल्या परिवर्तनाचं समग्र दर्शन घडवणारं ठरलं आहे. राज्य सरकारनं केलेल्या ऐतिहासिक सुधारणांमुळे बदललेल्या गावांचं दर्शन घडवणाऱ्या राज्याच्या यशोगाथेची झलक प्रदर्शनात पर्यटकांना पाहायला मिळत आहे.

दरम्यान, काल महाकुंभमेळ्यात जवळपास दीड कोटी भाविकांनी स्नान केलं. १३ जानेवारीपासून सुमारे ५३ कोटी भाविकांनी पवित्र संगमावर स्नान केल्याची नोंद झाली आहे.

****

नवी दिल्लीत आणि बिहारमध्ये आज पहाटे भूकंपाचे धक्के जाणवले. त्याची तीव्रता चार रिश्टर स्केल इतकी नोंदवण्यात आली. भूकंपाचा केंद्रबिंदू दिल्ली जवळ धऊला कुवा इथं जमिनीच्या खाली पाच किलोमीटर वर होता. यात अजून कोणतीही जीवित अथवा वित्त हानी झाल्याच वृत्त नाही.

****

प्रार्थना स्थळांसंदर्भातल्या कायद्याशी संबंधीत याचिकांवरची सुनावणी सर्वोच्च न्यायालयानं पुढे ढकलली आहे. आज यासंदर्भात सुनावणी होणार होती. कोणत्याही प्रार्थनास्थळाचं धार्मिक स्वरूप बदलण्यासाठी विद्यमान कायद्यात प्रतिबंध आहे. या पार्श्वभूमीवर १९९१ चा प्रार्थनास्थळ कायदा लागू करावा अशी मागणी याचिकाकर्ते खासदार असदुद्दिन ओवेसी यांनी केली आहे. या १९९१ च्या कायद्यानुसार, १९४७ च्या पूर्वी अस्तित्वात असलेल्या कोणत्याही धर्माच्या प्रार्थना स्थळाला कोणत्याही दुसऱ्या धर्माच्या प्रार्थनास्थळात बदलता येणार नाही अशी तरतूद आहे. मात्र ही तरतूद कायद्याद्वारे दिलेल्या तीन मूलभूत अधिकारांचा उल्लंघन आहे, असं हिंदू पक्षकरांचं म्हणणं आहे. हा कायदा हिंदू, जैन, बौद्ध आणि शीख धर्माविरोधी आहे असा दावा हिंदू पक्षकारांनी केला आहे.

****

परिक्षा पे चर्चा या कार्यक्रमाच्या आजच्या भागात क्रीडापटू मेरी कोम, अवनी लेखरा आणि सुहास यतीराज यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. आपल्याला आवड असेल तेच क्षेत्र निवडावं, तुमचे पालकही ते मान्य करतील, असा सल्ला सुहास यतीराज यानं दिला. दररोज पूर्ण लक्ष केंद्रित करून अभ्यास केला तर ते टिकवून ठेवू शकाल, असं अवनी लेखरा हिने सांगितलं. तर मेरी कोम यांनी यावेळी बोलताना, जर तुम्हाला आव्हानं स्वीकारायची असतील तर तुम्ही पुरेसे बलवान असलं पाहिजे, असं सांगितलं.

****

राज्यातला साखर हंगाम आता अखेरच्या टप्प्यात आला आहे. आतापर्यंत सुमारे ६१ लाख टन साखरेचं उत्पादन झालं असून, १४ कारखान्यांनी आपली धुराडी बंद केली आहेत. सर्वाधिक १७ लाख टन साखर उत्पादन कोल्हापूर विभागात झालं; तर पुणे विभागात १४ लाख टन साखर उत्पादित करण्यात आली. यंदा राज्यात ८५ लाख टन साखर उत्पादनाचा अंदाज व्यक्त करण्यात आला होता; मात्र विविध कारणामुळे साखर उत्पादन अंदाजापेक्षा कमी होईल, तसंच यंदा गेल्या वर्षीच्या तुलनेत साखर गाळप हंगाम लवकर संपेल, असं साखर आयुक्तालयानं म्हटलं आहे.

****

प्रधानमंत्री आवास योजनेची नागरी भागात प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या प्रशिक्षणाचा यंत्रणेने लाभ घ्यावा, असं आवाहन, छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी केलं आहे. या प्रशिक्षणाच्या दुसर्या टप्प्यात ते आज छत्रपती संभाजीनगर इथं बोलत होते. लोकांना परवडणारी घरे देण्याचं कार्य सुलभ होण्यासाठी हे प्रशिक्षण लाभदायी असल्याचं सांगून, गोरगरिबांना स्वतःचं घर देण्यासाठी प्रत्येकाने संवेदनशिल, गतिमान पद्धतीने काम करावं, अशा सूचना गावडे यांनी दिल्या. या प्रशिक्षणात विभागातल्या पाच महानगरपालिका आणि ७५ नगरपालिकांचे मुख्याधिकारी, अभियंते, आवास योजनेशी संबंधित तांत्रिक सल्लागार सहभागी झाले आहेत.

****

२६व्या महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव स्पर्धा गडचिरोलीच्या गोंडवाना विद्यापीठात आजपासून सुरू होणार आहेत. येत्या २२ फेब्रुवारीपर्यंत चालणाऱ्या या स्पर्धेमध्ये राज्यातल्या २३ विद्यापीठांचे संघ सहभागी होत आहेत.

****

नांदेड इथं २१ ते २३ फेब्रुवारीला छत्रपती संभाजीनगर विभागाच्यावतीने राज्यस्तरीय महसूल क्रीडा आणि सांस्कृतिक स्पर्धेचं आयोजन श्री गुरु गोबिंदसिंघजी स्टेडियम इथं करण्यात आलं आहे. या स्पर्धेचं उद्घाटन राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिली. या स्पर्धेमध्ये जवळपास दोन ते अडीच हजार खेळाडू सहभागी होणार असून, मैदानी खेळाव्यतिरिक्त सर्व सात विभागाच्या सांस्कृतिक कार्यक्रमही होणार असल्याचं कर्डिले यांनी सांगितलं.

****